नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com

औरंगाबाद कृषी हवामान सल्ला — शुक्रवार दिनांक – २३.११.२०१९

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक २३ ते २७ नोव्हेंबर, २०१९) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | २३/११ | २४/११ | २५/११ | २६/११ | २७/११ |
| पाऊस (मिमी) | ००.० | ००.० | ००.० | ००.० | ००.० |
| कमाल तापमान (अं.से.) | २९.० | २९.० | ३०.० | ३०.० | २९.० |
| किमान तापमान (अं.से.) | १४.० | १४.० | १५.० | १५.० | १५.० |
| ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ५९ | ५५ | ६० | ६२ | ६५ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३७ | ३६ | ३१ | ३२ | ३७ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | ०७ | ०६ | ०८ | ०९ | ०९ |
| वा-याची दिशा | पूर्व | आग्नेय | आग्नेय | आग्नेय | आग्नेय |

| हवामानाचा इशारा | जिल्हयात पुढील पाच दिवसात हवामान कोरडे राहुन किमान तापमान किंचीत घट होईल. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| हरभरा | वाढीची अवस्था | हरभरा पिकाची पेरणी करून २० ते २५ दिवसाचा कालावधी झाला असल्यास तण व्यवस्थापनासाठी पहिली कोळपणी करावी. |
| गहु | पेरणी अवस्था | गहू पिकाची पेरणी १ डिसेंबरपुर्वी करून घ्यावी. पेरणीपूर्वी बियाण्यास कॅप्टन किंवा थायरम ३ ग्रॅम प्रती किलो याप्रमाणात बिजप्रक्रीया करावी. बियाण्यास अॅझोटाबॅक्टर आणि स्फुरद विरघळणारे जिवाणू संवर्धण यांची हेक्टरी १ किलो प्रत्येकी याप्रमाणे बिजप्रक्रीया करावी. |
| ऊस | लागवड अवस्था | पूर्व हंगामी ऊसाची लागवड केली नसल्यास नोव्हेंबर महिन्याअखेर पर्यंत बेणे प्रक्रीया करूनच ऊसाची लागवड पूर्ण करावी. |
| हळद | कंद वाढीची अवस्था | हळद पिकावरील कंदमाशीच्या व्यवस्थापनासाठी उघडे पडलेले कंद झाकून घ्यावेत व क्लोरपायरीफॉस ५० टक्के ५०० मिली प्रती एकर याप्रमाणात आळवणी करावी. हळद पिकात पानावरील ठिपके रोगाच्या व्यवस्थापनासाठी मॅन्कोझेब २५ ग्रॅम किंवा कार्बेन्डॅझिम १० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| संत्रा /मोसंबी | फळ वाढीची अवस्था | मृगबहार धरलेलया संत्रा / मोसंबी फळबागेत पाणीव्यवस्थापन करावे. अन्नद्रव्यांच्या कमतरतेमूळे फळगळ दिसून येत असल्यास ००:००:५० १० ग्रॅम + चिलेटेड झिंक ५ ग्रॅम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| डाळिंब | फळ वाढीची अवस्था | डाळिंब बागेत फळपोखरणा-या अळीचा प्रादुर्भाव दिसुन येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी बागेत विदयुत सापळे (लाईट ट्रॅप) लावावेत. |
| फुल शेती | वाढीची अवस्था | फुलपिकातील तणांचे व्यवस्थापन करावे. |

| | | |
|---|---|---|
| भाजीपाला | फळ वाढीची अवस्था | वांगी या भाजीपाला पिकावरील शेंडा व फळपोखरणारी अळीचा प्रादुर्भाव दिसुन येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी कलोरॅन्ट्रानिलीप्रोल १८.५ एससी ४ मिली किंवा क्लोरपायरीफॉस २० ईसी २० मिली किंवा सायपरमेथ्रीन १० ईसी ११ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| चारा पिके | वाढीची अवस्था | रब्बी हंगामात लागवड केलेल्या चारा पिकातील तणांचे व्यवस्थापन करावे. |

सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.